# पुणे महानगरपालिका

## * स्थायी समिती *

## कार्यपत्रिका क्रमांक ३२

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. १०/११/२०२०** रोजी सकाळी ११:०० (अकरा) वाजता **स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे दृक श्राव्य (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) द्वारे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**घनकचरा व्यवस्थापन आढावा**

**विषय क्र. ७१७**

पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाविषयी पंधरा क्षेत्रिय कार्यालयाकडील दि.१/१०/२०२० ते दि.३१/१०/२०२० अखेर पर्यंत पाठविलेला अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.उप आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) यांचे जा.क्र.घकव्यका/२८३९ दि. ४/११/२०२० चे पत्र.

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. ७१८**

मा.सौ.दिपाली धुमाळ, विरोधी पक्षनेत्या यांचे दि.४/११/२०२० चे पत्र.

पुणे महापालिका, पीएमपीएमएल च्या सर्व सेवकांनी कोरोना शहरात शिरकाव केल्यापासून ते अद्यापही कोरोना प्रतिबंधात्मक उपाय योजनाअंतर्गत काम करत आहेत. या काळात २४ बाय ७ पुणे मनपाचे कर्मचारी कार्यरत होते. दरवर्षी पुणे महापालिकेकडून पुणे महापालिका, पीएमपीएमएल कर्मचारी यांस दिवाळी सणानिमित्त सानुग्रह अनुदान व बोनस दिला जातो. यंदाच्या वर्षी देखील पुणे महापालिकेकडून पुणे महापालिका, पीएमपीएमएल कर्मचारी यांस सानुग्रह अनुदान व बोनस देणेची कार्यवाही तातडीने करावी.

**विषय क्र. ७१९**

मा.सौ.दिपाली धुमाळ, विरोधी पक्षनेत्या यांचे दि.४/११/२०२० चे पत्र.

पुणे महापालिकेकडे सुरक्षारक्षक व इतर सेवक कंत्राटी पध्दतीने घेतले जातात. शहरातील उद्याने, शाळा, मनपाच्या इमारती याठिकाणी ते कामास असतात. कोरोना शहरात शिरकाव केल्यापासून ते अद्यापही कोरोना प्रतिबंधात्मक उपाय योजनाअंतर्गत अनेक कंत्राटी सेवक हे २४ बाय ७ काम करत आहेत.

दरवर्षी सदर कंत्राटी सेवकांना दिवाळी सणानिमित्त बोनस दिला जातो. याचप्रमाणे यंदाच्या वर्षी देखील कंत्राटी सेवकांना बोनस देणेची कार्यवाही तातडीने करावी.

**विषय क्र. ७२०**

मा.राजेंद्र शिळीमकर, मा.सौ.वर्षा तापकीर व मा.दिपक पोटे यांचे दि.५/११/२०२० चे पत्र.

पुणे महापालिका, पीएमपीएमएल च्या सर्व सेवकांनी कोरोना शहरात शिरकाव केल्यापासून ते अद्यापही कोरोना प्रतिबंधात्मक उपाय योजनाअंतर्गत काम करत आहेत. या काळात २४ बाय ७ पुणे मनपाचे कर्मचारी कार्यरत होते. दरवर्षी पुणे महापालिकेकडून पुणे महापालिका, पीएमपीएमएल कर्मचारी यांस दिवाळी सणानिमित्त सानुग्रह अनुदान व बोनस दिला जातो. यंदाच्या वर्षी देखील पुणे महापालिकेकडून पुणे महापालिका, पीएमपीएमएल कर्मचारी तसेच कोरोना काळात काम केलेल्या कर्मचारी व कंत्राटी पध्दतीवर काम करणा-या सर्व कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान व बोनस देणेची कार्यवाही तातडीने करावी.

### माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्र. ७२१**

उप आयुक्त, (परिमंडळ विभाग क्र.१) पुणे महानगरपालिका यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.१६ ऑक्टोंबर २०२० ते ३१ ऑक्टोंबर २०२० ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.१/४२० दि.५/११/२०२० चे पत्र.

### सर्वात कमी रक्कमेचे टेंडर्स

**विषय क्र. ७२२**

प्रभाग क्र. ४० ड आंबेगाव बु. येथील रेलिकॉन सिटी शेजारी मोठया व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.देवकर अँन्ड सन्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४४,६४,१२५=५० पेक्षा २५.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३३,४८,०९४=१२ पर्यंत अधिक जी.एस.टी. र.रुपये ४,०१,७७१=२९ असे एकुण र.रुपये ३७,४९,८६५=४१ व विशेष भाववाढ सुत्रानुसार (स्टार रेट) येणारी फरकाची रक्कम देणेस अथवा कपात होणाऱ्या रक्कमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मलनि:/४१८ दि.४/११/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ७२३**

पुणे महानगरपालिकेच्या पुणे मनपाने सुचित केलेल्या ठिकाणी १३ KL क्षमतेची क्रायोजनिक लिक्विड ऑक्सीजन टँक पुरविणे, बसविणे व तद्नुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.स्पार्क इंडस्ट्रीज यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (पुर्वगणनपत्रक र.रु.३६,५०,०००/- पेक्षा ३.११% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३५,३६,४८५/- अधिक जी.एस.टी. १८% र.रुपये ६,३६,५६७=३० असे एकूण रक्कम रुपये ४१,७३,०५२=३० पर्यंत काम करुन घेणेस व त्यांच्याशी त्याप्रमाणे करारनामा करणेस आणि त्यांनी केलेल्या कामापोटी बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ई) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/४१९ दि.५/११/२०२० चे पत्र.

### एकच टेंडर प्रकरणे

**विषय क्र. ७२४**

पुणे शहरामध्ये विविध उत्सव, पालखी सोहळा व कार्यक्रमांसाठी भाडेतत्वावर आवश्यकतेनुसार पोर्टेबल टॉयलेट पुरविणे कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे.आदित्य एंटरप्रायजेस यांचे एकच टेंडर आले (पुर्वगणनपत्रक र.रु.४९,९९,०५०/- पेक्षा १६% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४१,९९,२०२/- जीएसटीसह पर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेसोबत करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/घनकचरा/४२१ दि.५/११/२०२० चे पत्र.

### मागील सभेचे विषय

**विषय क्र. ७२५**

मा.अजय खेडेकर व मा.धनराज घोगरे यांचे दि. १७/८/२०२० चे पत्र.

प्रभाग क्र.२५ ब वानवडी येथील कै.नामदेव शिवरकर दवाखानामधील डायलेसिस सेंटरची उर्वरित कामे पूर्ण करणेसाठी र.रु.२५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक, शहरातील विविध उद्यानांमध्ये विकास कामे करणे, पान क्र. २९१, यादी क्र.एसयु१, अ.क्र. २२५, बजेट कोड - सीई२६अे३३६/एसयु१-२२४, प्रभाग क्र. १२ क मधील थोरात उद्यान येथील म्युझिकल फाउंटनचे काम करणे | २५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक, भवन विभागाकडील शाळा, दवाखाने, मार्केट, मनपा इमारती, कोठ्या, समाजमंदिरे, घाट, स्मशानभूमी, विसर्जन हौद इ.बाबत देखभाल दुरुस्तीची कामे करणे, पान क्र. १५३, (यादी क्र. एसआर | | |

| | | |
|---|---|---|
| १४), पान क्र. ११८, बजेट कोड- आरई२२अे११३/एसआर१४-१६८, प्रभाग क्र.२५ ब वानवडी येथील कै.नामदेव शिवरकर दवाखानामधील डायलेसिस सेंटरची उर्वरित कामे पूर्ण करणे | --- | २५ लाख |

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्याने करावा असे दि. ६/१०/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ७२६**

मा.बापूराव कर्णेगुरुजी यांचे दि. ४/८/२०२० चे पत्र.

प्रभाग क्र.३ ड नगररोड क्षेत्रिय कार्यालयातील स.नं. १०३ महात्मा गांधीनगर येरवडा, पुणे ६ येथील रेडझोन (प्रतिबंधित) क्षेत्रातील ११७४ कुटूंबांना अन्नधान्याचे कीट देण्यासाठी आवश्यक ती र.रु. १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक, बजेट कोड - सीई२०ए१०२/एसए२-५५, प्रभाग क्र. ३ ड कलवड येथील मुख्य रस्त्याचे पुर्व भागातील रस्ते डांबरी करणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>प्रभाग क्र.३ ड मधील ११७४ नागरिकांना अन्नधान्याचे ११७४ कीटचे वाटप करणे | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्याने करावा असे दि. ६/१०/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ७२७**

अग्निशमन सेवा पुरविणेच्या दरामध्ये मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे दरवाढ करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/अग्निशमन/७१ दि.२०/५/२०२० चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्याने करावा असे दि. ६/१०/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ७२८**

पुणे महानगरपालिकेच्या चाळ विभागाकडील मनपा वसाहतीमध्ये राहणाऱ्या (रस्ता रुंदीकरण, पुरग्रस्त, गवनि पुर्नवसन व प्रकल्पबाधित) बिगर मनपा सदनिकाधारकांचे निवासी घरभाडे/लायसेन्स फी मध्ये भाडेवाढ करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/सीएसओ/१३९३ दि.१८/२/२०१९ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्याने करावा असे दि. ६/१०/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ७२९**

प्रभाग क्र. ३८ अ मधील बिबवेवाडी स.नं. ६५९ पार्ट येथील प्रसुतिगृह व प्राथमिक आरोग्य केंद्राचे इमारतीचे अर्धवट काम पुर्ण करुन कोव्हीड-१९ चे उपचाराकरिता तात्पुरत्या स्वरुपात ऑक्सीजन हॉस्पीटलची व्यवस्था करणेसाठी र.रु.३६५ लक्ष खालीलप्रमाणे वर्गीकरणाने उपलब्ध करुन देणेसाठी मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भवन/३०२ दि.२४/९/२०२० चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२०-२०२१ चे अंदाजपत्रक, मुख्य अभियंता (पथ) कार्यालय, CE20A1249/A6-211, पुणे शहरातील HCMTR रस्ते विकसीत करणे | ३६५ लक्ष | ---- |
| नविन सुचवलेले काम<br>अधिक्षक अभियंता (भवन) कार्यालय, प्रभाग क्र. ३८ अ मध्ये राजीव गांधी नगर येथे प्राथमिक आरोग्य केंद्र व प्रसुतिगृह उभारणे, CE17A242/SJ6-375 | ---- | ३६५ लक्ष |

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्याने करावा असे दि. ६/१०/२०२० च्या सभेत ठरले होते.)

## संकीर्ण

**विषय क्र. ७३०**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 67 ( 3 ) क मधील तरतुदीच्या अनुषंगाने कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाय योजने अंतर्गत उद्‌भवलेल्या परिस्थितीवेळी आपत्कालीन परिस्थितीमध्ये लागण झालेल्या रुग्णांच्या व संशयित रुग्णांच्या क्वारंटाईन कक्षाकरीता तातडीने खरेदी करण्यात आलेल्या आवश्यक साहित्याची बिले अदा करणेस मा.महापालिका आयुक्त यांची मान्यता घेण्यात आली असून सदरची बाब मा.स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभा यांचे निदर्शनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भांडार/४०८ दि.२/११/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ७३१**

सन २०१९–२० चे आर्थिक हिशोबाच्या जमाखर्चास मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले/४१४ दि. ३/११/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ७३२**

शिक्षण विभाग प्राथमिक पुणे मनपाकडे बालवाडी शिक्षिका व सेविका यांचे सण अग्रीम वाढीस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शिवि(प्राथ)/४१६ दि. ३/११/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ७३३**

वानवडी-रामटेकडी क्षेत्रिय कार्यालयाचे अंतर्गत क्रांतीवीर संत गाडगे महाराज प्राथमिक विद्यालय, कोंढवा खुर्द येथे स्थापित केलेल्या विलगीकरण कक्षासाठी दि.२५/०६/२०२० पासून स्थापत्य विषयक कामे करणे हे काम अति तातडीची बाब म्हणून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७ (३) (क) अन्वये करणेत आलेल्या खालील बाबी मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.४/४१७ दि.३/११/२०२० चे पत्र.

१) वानवडी-रामटेकडी क्षेत्रीय कार्यालयाचे अंतर्गत संत गाडगे महाराज प्राथमिक विद्यालय, कोंढवा खुर्द येथे स्थापित केलेल्या विलगीकरण केंद्र साठी दि. २९/०६/२०२० ते ३१/०८/२०२०पर्यंतच्या स्थापत्य विषयक कामे करणे या केलेल्या कामांना पश्चात मान्यता मिळणेस, त्यासाठी ठेकेदार मे. निलेश तरवडे कन्स्ट्रक्शन व मे. संतोष पांडुरंग पिसे यांचेशी करारनामा करणेस व प्रत्यक्ष झालेल्या कामांच्या मोजमापानुसार संबंधिताना बिल अदा करणेस. (पू. ग. प. र.रु. १२७३१०४=४८)

२) या होणाऱ्या कामाचे दि. २९/०६/२०२०पासूनचे बिल खालील अर्थशिर्षकामधून अदा करणेस.

महसुली कामांसाठी – RE17F257

Covid-19 अंतर्गत आवश्यक महसुली कामांसाठी (खर्च)

३) वरील अ.क्र. १ व २ ची अंमलबजावणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)(क) नुसार दि. २९/०६/२०२० ते ३१/०८/२०२०पर्यंत काम करणेस.

**प्रभारी नगरसचिव,**

पुणे महानगरपालिका.

(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)

**सुचना – कोरोना विषाणूमुळे उद्‌भवलेली परिस्थिती विचारात घेवून मे.केंद्र व राज्य शासनाच्या आदेशाचे तंतोतंत पालन करावे ही विनंती. व्हिडीओ कॉन्फरन्सींगची लिंक आपणास व्हॉट्सअॅप द्वारे कळविण्यात येईल.**